# माझेही मत

प्रकाशित:

**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ

© पुनरारंभ

website: http://www.rajratna.co.in Email: ratnakar.wani@rajratna.co.in

# माझेही मत

दि.०८.०२.१३च्या सकाळ मधील मुक्तपीठ मधील श्री.शांताराम वाघ यांनी मांडलेली वृध्दांच्या सद्य स्थितीतील 'विस्कटलेलं समाज जीवन' ही कैफियत वाचण्यात आली.

या बाबतीत अजून बोलायचे झाल्यास खरोखरीच सद्य स्थितीत बहुतांशी वृध्द समाजातील विस्कटलेल्या जीवना नुसार वंचितांचे जीवन जगत आहेत. काही दुर्दैवाने अकाली जीवन साथी सोडून गेल्यामुळे, तर काही समाज रचित अडचणींमुळे. समाजरचित अडचणींना बहुतांशी, काही अपवाद वगळता, हल्लीची तरूणपीढी कारणीभूत ठरेल असे म्हटले तर वावगे ठरू नये. त्यांच्या लेखी घरातील वृध्द म्हणजे एक प्रकारची अडगळ. म्हणून नाईलाजास्ताव वृध्दांना वृध्दाश्रमाचा आधार घ्यावा लागतो. अपवाद वगळता, त्यात महत्वाची भुमिका हल्लीच्या तरूणी पार पाडत असल्याचे दिसते. त्यांना घरात सासू सासरे वा सासरची मंडळी यांच्या पासून दूर राहण्याची मानसिकता निर्माण झालेली आहे. मी माझा नवरा व माझी मुले असा त्रिकोणी अथवा चौकोनी संसारातच त्यांना गोडी वाटते. घरात वृध्दांकरवी आपल्या मुलांवर चांगले संस्कार घडावेत, त्यांच्या जिवनातील चांगल्या वाईट अनुभवांचा लाभ घेत आपले जीवन पण सुखी व्हावे असे त्यांना वाटतच नाही. प्रसंगी असे देखिल ऐकिवात येते की, काही ठिकाणी त्यांच्या अशा स्वभावाला माहेरच्या मंडळींचा पाठींबा असतो व त्यांच्या कडून मिळत असलेल्या अथवा मिळालेल्या प्रोत्साहनमुळे ते एकत्र कुटुंबातुन निघून विभक्त होतात. या पुढचे पाउल म्हणजे एकाच शहरात असून देखिल आपल्या मुलांना आजी आजोबाचे प्रेम वा सहवास मिळू नये अशी सुप्त भावना निर्माण झालेली दिसते.

आज काल आपल्या मुलांना चांगले शिक्षण मिळावे म्हणून इंग्रजी अथवा मराठी माध्यमाच्या नामांकित चांगल्या शाळेत दाखल करण्याची फॅशनच निघाली आहे व ते बालकाच्या भविष्याचा विचार करता योग्य आहे. शाळेत भरतीचे वेळी शाळा व्यवस्थापनाकडून पालक व बालक दोघांची मुलाखत घेतल्यानंतरच शाळेत प्रवेश दिला जातो हे पण चांगलेच आहे. परंतु मुलाखती दरम्यान घरात आजी आजोबा आहेत का असल्यास त्यांचा सहवास व प्रेम मुलांना मिळते की नाही याबाबत विचारणा होत नसावी. मला वाटते या बाबतीत तरूण तरूणीं मध्ये शाळांकरवी देखिल उदबोधन क रावे. शक्य झाल्यास त्यांच्यासाठी वेगळी कार्यशाळेचे आयोजन करून वृध्दांसंबंधी त्यांची मानसिकता बदलण्याचा प्रयत्न व्हावा. अजून शक्य असल्यास शाळेमध्ये बालक पालक व आजी आजोबां समवेत बालक-पालक, आजी आजोबा दिवसाचे एकत्रित आयोजन करावे जेणे की आजी आजोबांना देखिल आपल्या

नातवाच्या बाल क्रिडांचा आनंद उपभोगता येईल. या संदर्भात सरकार दरबारी नुसते कायदे करून काही होणार नाहीत तर तरूणांच्या मनी वृध्दांविषयीची मानसिकता कशी बदलता येईल हा विचार फार महत्वाचा आहे.

# आम्ही विदेश संचार वासी

आम्हा विदेश संचार सेवा/विदेश संचार निगम लिमिटेड च्या सेवा निवृत्त कर्मचा-याचा स्नेह मेळावा म्हणजे आम्हासाठी पर्वणीच असते. दरवर्षी वर्षातून एकदा सर्वांनी एकत्र भेटायचे. गप्पा गाष्टी दौरान आपली वैयक्तिक तसेच कौटुंबिक सुख दुःखे एकमेका सांगत आपसात वाटून घ्यायची. जुन्या गोष्टींना/आठवणींना पुन्हा नव्याने उजाळा देत भुतकाळात रमायचे. एकत्रित स्नेह भोजनाचा आनंद घ्यायचा व दिवस आनंदात घालवायचा हा स्नेहमेळाव्याच मुख्य उद्देश असतो. सेवा काळ दरम्यान बहुतांश कर्मचारी व अधिकारी आर्वी व दिघी येथील वसाहतींमध्ये एक कुटुंब या नात्याने राहीलेत. प्रत्येक घरातील सुख दुःखात सर्वांचा सहभाग हा असायचाच. केवळ प्रेम व भेटीच्या उत्कट भावनेने या मेळाव्यास उपस्थित राहण्यास उत्सुक असतो.

या स्नेह मेळाव्याचे विशेष म्हणजे स्नेहमेळाव्याची निश्चित तारीख, वेळ व स्थान समजल्यावर सर्वजण एकमेकास कर्तव्यभावनेने कळवितात. केवळ एका संदेशावर पुणे परिसरातील तसेच जिल्ह्यातील सर्व अधिकारी पदापासून चतुर्थ श्रेणी कर्मचा-यापर्यंत सेवानिवृत्त झालेले विदेश संचारवासी, आपला कितीही महत्वाचा व्यग्र दिवस असो, सर्व कामे बाजूला सारून वेळेवर नियोजित स्थळी पोहचतात व आनंदाने सहभागी होतात.

असा हा स्नेहमेळावा नुकताच दि.५ एप्रिल २०१३ रोजी आळंदी येथे वडगाव रोड वर सिध्दीविनायक मंगल कार्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाचे आयोजन विदेश संचारचे माजी सेवानिवृत्त कर्मचारी सर्वश्री.आर.जी.वाणी, एस.व्ही.उदास, अशोक कानिटकर, निजाम तांबोळी, एस.जी. सिन्नरकर, एस.एस.वेदपाठक तसेच एस.एस.बागल या उत्साही मंडळींनी केले. कार्यक्रमास फार छान प्रतिसाद मिळाला. सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित

होते. सर्व उपस्थितांचे गुलाब पुष्प देउन स्वागत करण्यात आले. व्यासपिठावर वयाची पंचाहत्तरी पार केलेले श्री.बी.व्ही.मोडक, व श्री.आचार्य तसेच पी.जी.सरपोतदार, बी.जी.पुजारी, आर.एम.कुंभार इ.अधिकारीगण उपस्थित होते. आपल्या भावना व्यक्त करतांना व्यासपीठाधिन अधिका-यांनी भूतकाळातील आठवणीनाउजाळा देत, त्यांना त्यांच्या कार्यकाळात सर्वांकडून कसे सहकार्य मिळाले व कार्यकाळ गोड कसा झाला हे थोडक्यात, मुद्देसुद व रंजित करून सांगितले. अधिकारीपद भूषवितांना कित्येक वेळेस कधी कर्मचारी हितविरोधी तर कधी त्यांच्या हितावह निर्णय घ्यावे लागलेत. सेवा काळात आम्ही पदाधिकारी तर आपण सर्व कर्मचारी या रूपात होतो. परंतु सेवानिवृत्तीनंतर आज या क्षणी अधिकारी कर्मचारी असा भेद नसून सर्व जण केवळ सेवानिवृत्त कर्म चारी आहोत. या स्नेहमेळाव्यात भेटीगाठी व गप्पांव्यतिरिक्त मिळणारे निवृत्तीवेतन तसेच वैद्यकिय फायदे लाभ या विषयावर पण सविस्तर मार्गदर्शनपर चर्चा झाली. सर्वांनी दुपारी २ वाजता स्नेहभेजनाचा आस्वाद घेतला. श्री.निजाम तांबोळी यांनी सूत्र संचालन केले.

कार्यक्रमाच्या दुस-या सत्रात इतर सर्व कर्मचा-यांची भाषणे झाली. यात त्यांनी आपल्यावर काय प्रसंग ओढवले व ते कसे हाताळले हास्यविनोद करित कथन केले.

या स्नेहमेळाव्याची एक वाखणण्या जोगी गोष्ट म्हणजे येथे उतारवयात पाचविल्या पुजलेल्या व्याधी, दुःख, वेदनाचा सर्वांना विसर पडतो. सकाळी काहीशा दुःखी, कष्टी, चिंतीत चेह-याने आलेली व्यक्ती संध्याकाळी कळी खुलावी किंवा शक्तीवर्धक डोस मिळाल्यावर चेहरा उजळावा तसा प्रसन्न, हसरा चेहरा घेउन परत पुढच्या स्नेहमेळाव्याला भेटण्याची उमेद ठेवत घरी परतले. वयाची साठी पार केलेले सर्व यंग सिनिअर्सना पाहून संत श्रेष्ठ श्री.ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिलेल्या पंक्तीची आठवण होते. " इवलेसे रोप लावियले द्वारी वेलू तयाचा गेला गगनावरी."

# माझेही मत

शनिवार दि. २७.0७.२0१३ च्या सकाळ मधील " ज्येष्ठ नागरिकांच्या तक्रारीमध्ये वाढ"वाचण्यात आले.

सद्य परिस्थितीत खरोखरीच वृध्दांना वंचितांचे जिवन जगावे लागत असल्याचे जाणवते. काही दिवसांपुर्वीची गोष्ट. संध्याकाळी फिरून परततांना रस्त्याच्या डाव्या बाजुने सुरक्षिरत रित्या मार्ग क्रमण करित होतो. त्याच वेळी मागून मोटरसायकलवर तीन तरूण आले आणि माझ्या उजव्या हाताला धक्का देउन वेगात निघून गेले. यात माझी काही चूक नसतांना जाता जाता मला " ए थेरडया नीट चालता येत नाही काय?" असे उपरोधिक दोन शब्द सुनावून गेले. आजची तरूण पिढी सुपात आहे उद्या त्यांना पण जात्यात जावे लागणार आहे याची त्यांना कल्पना नाही. अशा प्रकारे वृध्दांना समाजाकडून तसेच काही प्रमाणात कुटुंबाकडून देखिल उपेक्षिले जात आहे. वृध्दांना मान मिळत नाही. त्यांच्या दृष्टीने मान सन्मान ही पुढची गोष्ट पण तत्पूर्वी किमान या उतारवयात दैनंदिन जिवनामध्ये थोडातरी मानसिक आधार, कौटुंबिक प्रेम मिळावे अशी प्रामाणिक व वाजवी अपेक्षा.

माझे मते, शासनाने वृध्दांसाठी कितीही कायदे केले तरी त्याचा फारसा फायदा होणार नाही. मुळात समाजामध्ये तसेच कुटुंबामध्ये वृध्दांबद्दल आदर, प्रेम, जिव्हाळा कसा निर्माण होईल यावर भर असावा. समाजामध्ये कुटुंबामध्ये समाजपरिवर्तन घडावे यासाठी गावांमध्ये, शहरांमध्ये वृध्दांशी निगडीत प्रश्न घेउन त्यावर छोटे मोठे सेमिनार, परिषद व चर्चासत्रे आयोजित करून वृध्दांनी त्यांच्या तरूण वयात तसेच शरीरात ताकद, उमेद असेपर्यंत कलेले कष्ट, मेहनत मिळविलेले ज्ञान, व अनुभव याची जनजागृती करावी. ज्याप्रमाणे कुटुंब नियोजन, एडस, मलेरिया निमुर्लन सारख्या शासकिय योजना राबवून त्यात यश मिळविले त्याच प्रमाणे वृध्दांच्या गरजा त्यांची सुरक्षितता त्यांची समाजाकडून कुटुंबाकडून होणारी अवहेलना थांबविण्यासाठी शासकिय योजना राबवावी. त्याचा प्रचार व प्रसार वर्त मान पत्रे दूरदर्शन सारखया प्रभावी माध्यमातून जनसामान्यापर्यंत पोचवावा.

" सोम, मंगळ, बुध, गुरू। ज्येष्ठ श्रेष्ठ वयोवृध्द हेच आमचे गुरू
शुक्र, शनी, रवि । वयोवृध्दांची अवहेलना थांबवायलाच हवी."

अशा प्रकारची वाक्ये तयार करून यातायात करणा-या वाहनावर लिहावीत.

शाळांमध्ये पालक दिन साजरे केले जातात, तेथे वृध्दांच्या अनुभवांचा उपयोग आपल्या जिवनात कसा करून घेता येईल, बालकांवर वृध्दांकडून सुसंस्कार कसे घडतील, त्यांचा आदर कसा करता येईल इ.विषयी उदबोधन करावे. आजकाल तरूणींमध्ये मी, माझा नवरा व माझी मुले याची मानसिकता झाली आहे. त्यामुळे कुटुंबे विभक्त झालीत. पर्यायाने काही ठिकाणी आवश्यकता म्हणून तर काही ठिकाणी नाईलाजाने वृध्दांना वृध्दाश्रमात जावे लागते. नात,नातू व आजी आजोबांचे हे नातेच वेगळे. दुधावरची साय म्हणून आजी आजोबा देखिल आपल्या नातवांवर मुलांपेक्षा जास्त प्रेम करतात. अशावेळी बालके आजी आजोबा असून देखिल त्यांच्या प्रेमापासून वंचित राहतात. याबाबतीत तरूणींचे देखिल उदबोधन व्हावे.

सध्या प्रत्येक शहरात व काही खेडयापाडयांमध्ये देखिल महिलाच्या तनिष्का गटाद्वारे नारी शक्ती मोठया प्रमाणात एकत्र झाल्याची दिसते. या महिला गटांनी दारूबंदी, पाणी प्रश्न, अवैध व बेसनदशीर कामे इ.सारखी विधायक कामे हाती घेतलीत व त्यांना त्यात यश देखिल प्राप्त झाले आहे. हा नारीशक्तिचा विजय आहे. त्यांचे यश प्रशंसनीय आहे. त्यांचा अशा विधायक कामासाठी गुण गौरव करावा तेवढा थोडाच आहे. या गटाने गावात, शहरात जिथे जिथे कुटुंबात वृध्दांचा अनादर अथवा उपेक्षिताची वर्तणूक मिळत असेल तेथे त्या कुटुंबातील सदस्यांशी व संबंधित वृध्दांमध्ये समुपदेशकांच्या सहाय्याने आपसात सुसंवाद घडवून आणावा. तसेच विभक्त कुटुंबांच्या सदस्यांना एकत्र कुटुंब पध्दतिचे महत्व समजावून देत उदबोधन केले तर त्यांच्या यशाच्या मुकुटमध्ये अजून एक मानाचा तुरा खोवता येईल.